Set - B

| Student Sign. | Jr. Supervisor Sign. |
|---|---|
| | |

**Shivaji University, Kolhapur – Examination, October 2020**

**Center : Rajarshi Chhatrapati Shahu College, Kolhapur**

**B.Com. Part - III (SEM - 5)**

**Business Regulatory Framework**

**Paper No.: 1** **Subject Code :- 51431**

| PRN No. | |
|---|---|

| Seat No. | |
|---|---|

Day & Date : **Saturday, 03/10/2020** Total Marks : **50**

Time : **2 PM to 3 PM**

Instructions : Attempt any 25 questions. Each Question carries 2 marks.
Write the Correct alternative in the Answer Box.

| | | |
|---|---|---|
| **Q. 1** | कोणताही कायदा अस्तित्वात येण्यामागे पुढीलपैकी कोणते घटक कारणीभूत असतात? | **Ans.** |
| | अ) परंपरा व चालीरिती. | |
| | ब) गैसर्गिक कार्याचे सुत्र | |
| | क) लोकांची मानसिकता व नितिमत्ता, घटना, न्यायव्यवस्था | |
| | ड) वरील सर्व | |
| **Q. 2** | व्यापार विषयक कायदे हे ------------- कायद्यावर आधारलेले आहेत. | **Ans.** |
| | अ) इंग्लिश व्यापारविषयक कायद्यावर. | |
| | ब) भारतीय व्यापार विषयक कायद्यावर | |
| | क) नैसर्गिक कायद्यांवर | |
| | ड) वरील सर्व पर्याय चूकीचे आहेत. | |
| **Q. 3** | भारतातील -------------------- कायदा हा व्यवसाय कायद्याचा प्रत्यक्ष व प्रमुख स्त्रोत आहे. | **Ans.** |
| | अ) वैधानिक कायदा | |
| | ब) भागीदारी कायदा | |

| | | |
|---|---|---|
| | क) कंपनी कायदा | |
| | ड) शिक्षणाचा कायदा | |
| **Q. 4** | वरिष्ठ न्यायालयांनी दिलेल्या निर्णयाचा वापर -------------- | **Ans.** |
| | अ) संदर्भ अथवा उदाहरण म्हणून त्याखालील कनिष्ठ न्यायालयात तत्सम परिस्थितीत निर्णय देणेसाठी कधीही करता येत नाही. | |
| | ब) संदर्भ अथवा उदाहरण म्हणून त्याखालील कनिष्ठ न्यायालयात तत्सम परिस्थितीत निर्णय देणेसाठी करता येतो. | |
| | क) संदर्भ अथवा उदाहरण म्हणून त्याखालील कनिष्ठ न्यायालयात तत्सम परिस्थितीत निर्णय देणेसाठी कधी कधी करता येऊ शकतो. | |
| | ड) वरील सर्व पर्याय चुकीचे आहेत. | |
| **Q. 5** | न्यायालयीन चालीरिती व पध्दती. | **Ans.** |
| | अ) हा कायद्याचा स्त्रोत नाही. | |
| | ब) हा कायद्याचा स्त्रोत अपवादात असू शकतो. | |
| | क) हा कायद्याचा प्रमुख स्त्रोत आहे. | |
| | ड) वरील सर्व पर्याय चुकीचे आहेत. | |
| **Q. 6** | व्यवसायिक कायदे म्हणजे ------------------ | **Ans.** |
| | अ) फक्त कंपन्यांचे कायदे. | |
| | ब) बँका व कंपन्यांचे कायदे. | |
| | क) व्यवसायांना लागू असणारे प्रचलित असे कायदे जे व्यावसायिक करार व व्यवहारातून निर्माण होणा-या जबाबदा-या पार पाडण्यास मदत करतात. | |
| | ड) फक्त वित्तीय कायदे. | |
| **Q. 7** | पुढीलपैकी कोणते कायदे व्यापार विषयक कायदे आहेत? | **Ans.** |
| | अ) भारतीय करारांचा कायदा. | |
| | ब) माल विक्री कायदा. | |
| | क) बँकींग नियमन कायदा. | |
| | ड) वरील सर्व कायदे. | |

| | | |
|---|---|---|
| **Q. 8** | ---------------- कायदा हा कामगार विषयक आहे. | **Ans.** |
| | अ) भारतीय करारांचा कायदा. | |
| | ब) कंपनी कायदा. | |
| | क) कामगारांचा वेतन देणारा कायदा १९३६. | |
| | ड) वरील सर्व पर्याय चूकीचे आहेत. | |
| **Q. 9** | भारतीय करारांचा कायद्यामध्ये करार या सज्ञेची व्याख्या कलम ----------- मध्ये केली आहे. | **Ans.** |
| | अ) कलम २ | |
| | ब) कलम ४ | |
| | क) कलम १ मध्ये | |
| | ड) कलम ५ मध्ये | |
| **Q. 10** | भारतीय करार कायद्यातील करार संज्ञेच्या व्याख्येनुसार प्रत्येक करारात कोणत्या महत्वाच्या घटकांचा समावेश करावा लागतो? | **Ans.** |
| | अ) दोन पक्ष | |
| | ब) ठराव | |
| | क) कायदेशीर जबाबदारी. | |
| | ड) वरील सर्व. | |
| **Q. 11** | कोणते विधान चुकीचे ते सांगा?<br>(अ) एखादी व्यक्ती स्वतःशी करार करु शकते. (ब) करारामध्ये कायदेशीर जबाबदारी निर्माण झालीच पाहिजे असे नाही. | **Ans.** |
| | अ) दोन्ही पर्याय बरोबर आहेत. | |
| | ब) दोन्ही पर्याय चुकीचे आहेत. | |
| | क) पर्याय 'अ' बरोबर 'ब' चूक. | |
| | ड) पर्याय 'ब' बरोबर 'अ' चूक | |
| **Q. 12** | सामाजिक अथवा कौटुंबिक जबाबदारी निर्माण होणा-या ठरावास ------ | **Ans.** |
| | अ) करार म्हणता येते. | |
| | ब) करार म्हणता येत नाही. | |

| | | |
|---|---|---|
| | क) कधी कधी करार असू शकतो. | |
| | ड) करार म्हणता आल्याने कायद्याने त्याची अंमलबजावणी होते. | |
| **Q. 13** | करारांच्या आवश्यक घटकात, ---------------- | **Ans.** |
| | अ) वैचारिक एकता हा आवश्यक घटक नाही. | |
| | ब) वैचारिक एकता हा आवश्यक घटक आहे. | |
| | क) वैचारिक एकदा कधी कधी आवश्यक असू शकते. | |
| | ड) वरील सर्व पर्याय चुकीचे आहेत. | |
| **Q. 14** | करार हा नेहमी ----------------- | **Ans.** |
| | अ) लेखीच असला पाहिजे. | |
| | ब) लेखी किंवा तोंडी असू शकतो. | |
| | क) लेखी व तोंडी असावा. | |
| | ड) तोंडीच असला पाहिजे. | |
| **Q. 15** | निर्मितीनुसार कराराचे वर्गीकरण, ------------------ | **Ans.** |
| | अ) व्यक्त किंवा स्पष्ट करार, गृहित करार इ. करार. | |
| | ब) पूर्तता झालेले करार, पूर्तता होणारे करार. | |
| | क) वर्जनिय करार, व्यर्थ करार, बेकायदेशीर करार. | |
| | ड) वरील सर्व पर्याय चुकीचे आहेत. | |
| **Q. 16** | मॉडर्न पेंटींग फर्मने अशिलांना इमारत ५०,०००/- रुपयांत रंगवून देण्याचा करार इमारतीचे मालक डफळे ब्रदर्स यांच्याशी केला. मॉडर्ना पेंटींगने अशिलांना इमारत मुदतीत रंगवून दिली आणि डफळे ब्रदर्स यांनी मॉडर्न पेंटींग फर्मला रु.५०,०००/- दिले हा ---------------- करार आहे. | **Ans.** |
| | अ) पूर्तता झालेला. | |
| | ब) पूर्तता होणारा. | |
| | क) एकांगी करार | |
| | ड) करारच नाही. | |

| | | |
|---|---|---|
| **Q. 17** | भारतीय करार कायद्यातील कलम १० नुसार ठरावाचे रुपांतर करारात होण्यासाठी कोणत्या घटकांची आवश्यकता आहे. | **Ans.** |
| | अ) पात्र व्यक्तींची स्वेच्छेने दिलेली मान्यता. | |
| | ब) कायदेशीर उद्देश | |
| | क) प्रतिफल | |
| | ड) वरील सर्व घटक | |
| **Q. 18** | ज्या वेळेस ठरावातील संबंधित असणा-या व्यक्तीपैकी एकाची संमती ही फसवणूकीने, बलप्रयोगाने, नैतिक वजनाने अगर खोटे विधान अगर असत्य प्रतिपादन करुन मिळविलेले असेल तेंव्हा अशा प्रकारे संमती देणा-या व्यक्तीच्या दृष्टीकोनातून हा करार ------------- असतो. | **Ans.** |
| | अ) वर्ज्य असतो. | |
| | ब) वर्जनिय असतो. | |
| | क) बेकायदेशीर असतो. | |
| | ड) वरीलपैकी काही नाही. | |
| **Q. 19** | करारामध्ये --------------- | **Ans.** |
| | अ) उद्देश व प्रतिफल कायदेशीर असावे लागते. | |
| | ब) उद्देश कायदेशीर व प्रतिफल बेकायदेशीर असले तरी चालते. | |
| | क) उद्देश बेकायदेशीर व प्रतिफल कायदेशीर असले तरी चालते. | |
| | ड) उद्देश व प्रतिफल नसूनही करार करता येतो. | |
| **Q.20** | भारतीय कायद्यानुसार जेंव्हा संमती पुढीलपैकी कोणत्या कारणामुळे दिलेली नसेल तरच त्यास स्वेच्छेने दिलेली संमती म्हणतात. | **Ans.** |
| | अ) धाक किंवा बलप्रयोग. | |
| | ब) नैतिक वजन किंवा अनुचित प्रभाव. | |
| | क) कपट, असत्य प्रतिपादन, चुक | |
| | ड) वरील सर्व | |

| | | |
|---|---|---|
| **Q.21** | ‘अ’ ते ‘ब’ ला त्यांच्यावरील फौजदारी गुन्हयाचा दावा काढून टाकण्याचे वचन दिले व ‘ब’ ने ‘अ’ या कामासाठी रुपये २,०००/- देण्याचे वचन दिले हा ठराव ------------------- आहे. | **Ans.** |
| | अ) वर्जनिय आहे. | |
| | ब) व्यर्थ आहे. | |
| | क) कायदेशीर आहे. | |
| | ड) वरील सर्व पर्याय चुकीचे आहेत. | |
| **Q.22** | सर्व ठरावांची --------------- | **Ans.** |
| | अ) कायदेशीर अंमल बजावणी होते. | |
| | ब) कायदेशीर अंमल बजावणी, जर त्या ठरावात भारतीय करारांच्या कायद्यातील सर्व घटकांचा समावेश असेल, तरच होऊ शकते. | |
| | क) कायदेशीर अंमलबजावणी होणे पोलीसांच्या हातात असते. | |
| | ड) वरील सर्व पर्याय चुकीचे आहेत. | |
| **Q.23** | अशक्य असणा-या ठरावाचे करारात रुपांतर -------------- | **Ans.** |
| | अ) कधी कधी होऊ शकते. | |
| | ब) होते. | |
| | क) होत नाही. | |
| | ड) कोर्टाच्या अनुमतिनेच होते. | |
| **Q.24** | पुढीलपैकी करारभंगाच्या उपाय योजना कोणत्या? | **Ans.** |
| | अ) करार रद्द करणे. | |
| | ब) नुकसान भपाईसाठी दावा | |
| | क) योग्य रक्कमेसाठी अध्यर्थन | |
| | ड) वरील सर्व | |
| **Q.25** | ज्या वेळेस एक व्यक्ती आपल्या स्वतःच्या वर्तवणुकीमुळे किंवा इतर व्यक्तींच्या वर्तवणूकीमुळे, दुस-या व्यक्तीला झालेले हानीची किंवा नुकसानीची भरपाई देण्याचे वचन एखाद्या कराराच्या साहाय्याने देते तेंव्हा त्यास -------------------- करार म्हणतात. | **Ans.** |

| | | |
|---|---|---|
| | अ) जामिनकीचा करार. | |
| | ब) नुकसान भरपाईचा करार | |
| | क) जबाबदारीचा करार | |
| | ड) करार नाही | |
| **Q.26** | जेंव्हा 'अ' या जवाहि-याने 'ब' कडे हिरे पैलू पाडण्यासाठी दिले. 'अ' व 'ब' यांच्यातील करार हा ---------------- करार होय. | **Ans.** |
| | अ) जामीनकीचा करार | |
| | ब) नुकसान भरपाईचा करार. | |
| | क) प्रतिनिधीत्वाचा करार. | |
| | ड) निक्षेपाचा करार. | |
| **Q.27** | मालाच्या विक्रीसाठी मालाचा ताबा ज्या व्यापारी प्रतिनिधी जवळ दिला जातो, त्यास ----------------- म्हणतात. | **Ans.** |
| | अ) दलाल. | |
| | ब) आडत्या | |
| | क) लिलावाला | |
| | ड) वचनपूर्ती हमी देणारा प्रतिनिधी | |
| **Q.28** | मालाच्या विक्रीचा करार दि. -------------- मध्ये जम्मू व काश्मिर वगळता भारतामध्ये लागू केला गेला. | **Ans.** |
| | अ) १ ऑगस्ट १९३० | |
| | ब) १ जुलै १९३० | |
| | क) १ ऑक्टोबर १९३० | |
| | ड) १ डिसेंबर १९३० | |
| **Q.29** | भारतीय संसदेने दि. ----------------- या दिवशी मर्यादित भागीदारी विधेयक पारित केले. | **Ans.** |
| | अ) १३ डिसेंबर २००८ | |
| | ब) १३ ऑक्टोबर २००८ | |
| | क) १३ जानेवारी २००८ | |
| | ड) १३ फेब्रुवारी २००८ | |

| | | |
|---|---|---|
| **Q.30** | (अ) कायद्याच्या दृष्टीकोनातून मर्यादित दायित्व भागीदारी संस्थेस चिरंतन अस्तित्व नसते. (ब) मर्यादित दायित्व भागीदारी संस्था स्वतःच्या नांवे व्यवहार करु शकत नाही. | **Ans.** |
| | अ) वरील दोन्ही पर्याय चुकीचे आहेत. | |
| | ब) वरील दोन्ही पर्याय बरोबर आहेत. | |
| | क) पर्याय 'अ' बरोबर पर्याय 'ब' चुक | |
| | ड) पर्याय 'ब' बरोबर पर्याय 'अ' चुक | |